**वादीतर्फे साक्षीदार क्र. ०१ यांचा उलटतपास शपथेवर सुरु–**

**प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. एम.डी.कुंटे यांचे मार्फत –**

मी दावा मिळकतीबाबत संपूर्ण माहिती वादी क्र.१ ते ३ यांचेकडून घेतलेली आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीचा सर्व्हे नं.३६ असून, हिस्सा नं.५५ आहे. त्याचे क्षेत्र ०.६ आहे. मला दावा मिळकतीचा आकार सांगता येत नाही. मला दावा मिळकतीच्या चतूःसीमा सांगता येत नाहीत. मी दावा मिळकतीचा सातबाराचा उतारा पाहिलेला आहे. मी सदरचा उतारा सन २०१६ मध्ये पाहिलेला आहे. मी दावा मिळकतीचा सातबाराचा उतारा त्यानंतरही पाहिलेला आहे. मला नियंत्रित सत्ता प्रकार काय आहे, याची माहिती नाही. मला दावा मिळकतीवर कोणाचेतरी नियंत्रण असलेबाबत समजले होते. हे म्हणणे खरे आहे की, नियंत्रण हटविल्याशिवाय करार करता येणार नाही, याची मला माहिती होती. मी प्रस्तुतकामी दावा मिळकतीवरील नियंत्रण हटविल्याचे कागदपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी तसे कागदपत्र दाखल केले नाही.

२. हे म्हणणे खरे आहे की, माझा प्रतिवादींशी करार झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी व आमचेत कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुळ मालकाविरुध्द दावा मिळकतीचे खरेदीखत पूर्ण करुन देणेबाबत दावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायत इमला क्र.३८४० हा दावा मिळकतीमध्ये असल्याबाबतचा कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी वादीसोबत करार करुन, वेळोवेळी पैसे घेवून, खरेदीखत करुन देण्यास टाळाटाळ व फसवणूक केली, हे माझे सरतपासतील व दाव्यातील म्हणणे काल्पनीक व खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या

दाव्यातील व सरतपासातील दाव्याचे कारण मी खोटे व चुकीचे नमुद केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना नोटीस पाठविण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचेवर करार पूर्ण करुन देणेचे कोणत्याही प्रकारचे बंधन नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या दाव्यामध्ये नमुद केलेला दि.२९.११.२००० रोजीचा करार खोटा, खोडसाळ व अम्मलबजावणीस पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा व खोडसाळ आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमचा दावा मिळकतीशी कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीविरुध्द खोटा दावा दाखल करुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/–

(श्रीम. आर.जी.कुंभार)

दिनांक– १४/१०/२०२५

अति. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),कुडाळ.